# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

### **मराठी विभाग**

लोकमत पुणे, बुधवार, दि. १ मार्च २०१७ ७

मराठी भाषा दिन विशेष

पुरुषोत्तम काळे : हुतात्मा महाविद्यालयात मराठी भाषा दिनानिमित्त कार्यक्रम

# संस्कृती टिकली तर मराठीचे संवर्धन

राजगुरुनगर : 'बदलत्या काळात जागतिकीकरण व यांत्रिकीकरणामुळे मराठी भाषेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. मराठी भाषेचे उपयोगितामूल्य कमी होत चालले आहे; या पार्श्वभूमीवर भाषा आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध असून, मराठी संस्कृती टिकली तरच मराठी भाषेचे संवर्धन होईल,' असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक डॉ. पुरुषोत्तम काळे यांनी राजगुरुनगर येथे केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्तच्या कार्यक्रमात ते 'मराठीची स्थिती - गती' या विषयावर बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील होते. या प्रसंगी डॉ. टी. जी. शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, डॉ. संजय शिंदे, प्रा. सचिन मुळूक, प्रा. वर्षा कांबळे आणि कला शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयामध्ये मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित हस्ताक्षर स्पर्धेचे बक्षीस वितरण करताना डॉ. पुरुषोत्तम काळे.

महाराष्ट्रात नोकरी करण्यासाठी मराठी भाषा यायला हवी. इंग्रजी भाषेतील शब्दांना सुलभ असे पारिभाषिक शब्द मराठीत तयार करावे, विज्ञान व तंत्रज्ञानाचे शिक्षण मराठीत घेता यावे. मराठीतून शिक्षण घेतल्यावर नोकरीची हमी मिळावी. मराठी माध्यमांच्या शाळांचा दर्जा वाढावा. अभ्यासक्रमात व्यावहारिक व उपयोजित मराठीचा अंतर्भाव व्हावा. बोलीभाषेचे संवर्धन व्हावे, असे अनेक पर्याय त्यांनी सांगितले. मराठी भाषेचा विकास झाला तर मराठी भाषक म्हणून आपल्याही तो सन्मान असल्याचे ते म्हणाले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी सर्व प्रकारचे शिक्षण मराठी भाषेतून उपलब्ध झाले तरच मराठीची मुळे स्थिर व सकस राहतील असे सांगितले. (वार्ताहर)

## भाषेचे नुकसान : ज्ञानभाषा होण्यासाठी प्रयत्न

- काळे यांनी मराठी भाषेच्या उत्क्रांतीचा आढावा घेताना कोणत्याही भाषेचा विकास हा तेथील संस्कृतीच्या विकासाबरोबर होत असल्याचे सांगितले. जर संस्कृतीसमोर आव्हान निर्माण झाले तर त्याचा परिणाम भाषेवर होत असतो असे सांगितले.
- ग्रामीण जीवनातील जातं गेलं त्याबरोबर ओव्याही गेल्या. मोटेवरील गाणी मोटेबरोबर गेली. कृषिजीवनातील अनेक गोष्टी काळाच्या ओघात नाहीशा झाल्या. सण-उत्सव, लग्नसमारंभ साजरे करण्यातील सांस्कृतिक संदर्भ बदलले. अनेक शब्द, म्हणी, वाक्प्रचार लोप पावले. यामुळे मराठी भाषेचे खूप नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर मराठी लोकसंस्कृतीचे जतन करतानाच मराठी ज्ञानभाषा होण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. पहिलीपासून पदवीपर्यंत मराठी विषय अनिवार्य हवा.



सकाळ
पुणे, गुरुवार
४

# 'संस्कृती टिकली तरच भाषेचे संवर्धन'

राजगुरुनगर : जागतिकीकरण व यांत्रिकीकरणामुळे मराठी भाषेचे उपयोगिता मूल्य कमी होत चालले आहे. मराठी संस्कृती टिकली तरच भाषेचे संवर्धन होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक डॉ. पुरुषोत्तम काळे यांनी येथे केले.

मराठी भाषा दिनानिमित्त, येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात 'मराठीची पिछेहाट' या विषयावर ते बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डॉ. टी. जी. शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, डॉ. संजय शिंदे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. वर्षा काकडे आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. काळे म्हणाले, की संस्कृतीसमोर आव्हान निर्माण झाले तर त्याचा परिणाम भाषेवर होतो. ग्रामीण जीवनातील जाते गेले त्याबरोबर ओव्याही गेल्या. मोटेवरील गाणी मोटेबरोबर गेली. कृषिजीवनातील अनेक गोष्टी काळाच्या ओघात नाहीशा झाल्या. सण- उत्सव, लग्नसमारंभ साजरे करण्यातील सांस्कृतिक संदर्भ बदलले. अनेक शब्द, म्हणी, वाक्प्रचार लोप पावले. यामुळे मराठी भाषेचे मोठे नुकसान झाले आहे. म्हणून मराठी लोकसंस्कृतीचे जतन केले पाहिजे. तसेच मराठी ज्ञानभाषा होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सर्व प्रकारचे शिक्षण मराठी भाषेतून उपलब्ध झाले तरच मराठीची मुळे स्थिर व सक्षम राहतील, असे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी सांगितले.

मराठी भाषा दिनानिमित्त मराठी वाङ्मय मंडळाने आयोजित केलेल्या हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम आलेल्या प्रियंका राऊत व काव्यवाचन स्पर्धेत प्रथम आलेल्या पूनम शितोळे यांना डॉ. काळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख